# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २२९ वा बुधवार दि.०५ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 'सर्वोच्च' लांबणीवर?

नवी दिल्ली : राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका प्रकरणात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. यावेळी राज्य सरकारकडून तुषार मेहता यांनी पुन्हा वेळ मागून घेतला आहे. दोन्ही बाजूंच्या याचिकाकर्त्यांमध्ये संभ्रम आहे. यामुळे कोर्टाने कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. त्यानंतर आम्ही पुढच्या वेळी सुनावणी करू, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर गेल्या आहेत. आता पावसाळ्यानंतरच या निवडणुका होण्याची शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक राज सुरु आहे. मुंबई, पुण्यासह अनेक महानगरपालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये ३ ते ४ वर्षांपासून निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे सर्वांचे लक्ष आता या निवडणुकांकडे लागले आहे. लोकसभेपाठोपाठ राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याच्या हालचाली सुरु होतील, अशी अपेक्षा होती. परंतु सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे या निवडणुका पुन्हा एकदा पुढे ढकलल्या आहे.

सर्वोच्च न्यायालयात याचिका का?

ओबीसी आरक्षणचा विषयावरुन सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. त्यात प्रभाग फेररचनेचा मुद्दा आहे. त्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली नाही. राज्य सरकार आणि आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते या दोघांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हव्या आहेत. परंतु काही मुद्यांवर दोन्ही बाजूंमध्ये मतभेद आहेत. त्यामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे.

निर्णय पुन्हा लांबणीवर

सर्वोच्च न्यायालयात आज यासंदर्भात निर्णय झाला नाही. यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी होण्याची शक्यता नाही. कारण होळीमुळे ९ ते १६ मार्च सर्वोच्च न्यायालयास सुटी आहे. त्यानंतर कोर्टाकडून तारखी दिली जाईल. त्या तारखेवर सुनावणी होईल. त्या तारखेला सुनावणी झाली नाही तर कोर्टाला उन्हाळी सुटी लागेल. यामुळे हा विषय लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.

## निलंगेकर कुटूंबियांचे धिरज विलासराव देशमुख यांच्या कडून सांत्वन.



लातूर:--राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांच्या पत्नी आणि लातूर जिल्हा बँकेचे संचालक श्री. अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या मातोश्री सुशिलाबाई पाटील निलंगेकर यांचे नुकतेच निधन झाले. आज दिनांक ४/३/२०२५ रोजी त्यांच्या निलंगा येथील निवासस्थानी लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष श्री धिरज विलासराव देशमुख यांनी भेट देऊन स्व.सुशिलाबाई पाटील निलंगेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले आणि निलंगेकर कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी लातूर जिल्हा बँकेचे संचालक श्री. अशोकराव पाटील निलंगेकर, लातूर जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन श्री. प्रमोद जाधव, बँकेचे संचालक श्री. पृथ्वीराज शिरसाठ, काँग्रेसचे निलंगा तालुकाध्यक्ष श्री. विजयकुमार पाटील, श्री. लालासाहेब पटेल, काँग्रेसचे निलंगा शहराध्यक्ष श्री. संजय मोघे, श्री. संतोष भोसले आदिसह निलंगेकर कुटुंबिय उपस्थित होते.

## आजचा राजीनामा म्हणजे गुन्ह्याची कबुलीच

कोल्हापूर : बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर उफाळलेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर अखेर धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मात्र, हा राजीनामा उशिरा घेतला गेला असून तो म्हणजे एकप्रकारची गुन्ह्याची कबुलीच आहे, अशी परखड प्रतिक्रिया स्वराज्य पक्षाचे संस्थापक संभाजीराजे छत्रपती यांनी दिली आहे.

संभाजीराजेंनी संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून धनंजय मुंडेंवर जोरदार हल्लाबोल करत म्हटले, ''ही हत्या झाल्यानंतर आम्ही अडीच महिन्यांपूर्वीच धनंजय मुंडेंना मंत्रिपदच देऊ नये, अशी मागणी केली होती. मात्र, तरी देखील त्यांना मंत्रिपद देण्यात आले.

इतकंच नाही तर त्यांचा राजीनामा मागण्यासही अडीच महिने लागले. जर मुंडेंना किंचितही नैतिकता असती, तर त्यांनी हे मंत्रिपद त्याचवेळी सोडले असते. पण तसे झाले नाही. मंत्रिपदाचे कवच घालून ते आरोपपत्र दाखल होण्याची वाट पाहत होते का? आजचा राजीनामा म्हणजे एकप्रकारची गुन्ह्याची कबुलीच आहे!''

क्रौर्याची परिसीमा ओलांडली : बाळासाहेब थोरात



काँग्रेस नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी देखील या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत सरकारवर ताशेरे ओढले. त्यांनी सांगितले, ''स्व. संतोष देशमुख यांच्या मारेक-यांनी क्रौर्याची परिसीमा ओलांडली आहे. कोणत्याही संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारे ते फोटो आहेत. हे सर्व पुरावे ८० दिवसांपासून सरकारकडे होते, पण सरकारने काहीच केले नाही. सरकारने निर्लज्जतेचा कळस गाठला आहे. एखाद्या राजीनाम्याने हा विषय संपणार नाही, आम्ही न्यायासाठी लढत राहू.''

## कृष्णा आंधळेची हत्या झाली; आव्हाडांच्या दाव्याने खळबळ

पुणे : प्रतिनिधी संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असल्याने सातत्याने त्यांच्यावर राजीनाम्याचा दबाव वाढत होता. 'या कुटुंबाला न्याय द्या!' – जितेंद्र आव्हाड आक्रमक राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त करत सरकारवर हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, ''मी आधीच्या भाषणांमध्ये हे सर्व सांगितले होते. जेव्हा संतोष देशमुख अंतिम घटका मोजत होते, तेव्हा त्यांच्यावर नराधम, जल्लाद लघुशंका करत होते. पण त्यावेळी लोकांनी आमची टिंगल केली.'' तसेच, ''राज्यात माणसाच्या अंगात इतका क्रूरपणा कुठून आला? आपल्याकडे बहीण, बाप, भाऊ, मुलं आहेत. राज्यातील जनतेलाही या घटनेने हादरवून टाकले आहे.'' आव्हाड यांनी सरकारवर थेट आरोप करत म्हटले की, ''जेव्हा गुन्हे केल्यानंतर आरोपींना राजकीय पाठबळ मिळते, तेव्हा असे क्रूर प्रकार घडतात. जर यांना शिक्षा झाली नाही, तर पुढे आणखी असे प्रकार घडतील.'' तसेच, संतोष देशमुख यांचे हे फोटो जेव्हा त्यांची मुलं बघतील, त्यांना काय वाटेल? असा संतप्त सवालही त्यांनी केला. आव्हाड यांनी पुढे जाऊन अन्य प्रकरणांवरही भाष्य करत, ''महादेव मुंडे, किशोर फड, बापू अंधारे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळायला हवा. तसेच, कृष्णा आंधळे हा जिवंत नाही, त्याची हत्या झाली आहे,'' असे मोठे विधान केले. राजीनामा दिल्यानंतर धनंजय मुंडे यांनी ट्विटरवर पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ''संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे.

## सत्यशोधक डॉ संतुजी लाड यांची १८४ वी जयंती उत्साहात साजरी,

लातूर:– दि. ०४.०३.२५ रोजी सत्यशोधक समाजाचे अग्रदुत महात्मा जोतिबा फुले यांचे सहकारी शिष्य,हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १८४ व्या जयंती निमित्त डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने गांधी मैदान लातूर येथील नियोजित पुतळा परिसरात जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली आहे. सत्यशोधक डॉ संतुजी लाड यांच्या पुतळ्याचे दिपाने, धुपाणे पूजन करून फटकाच्या आतिषबाजीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिर संपन्न याप्रसंगी अँड डॉ सुनिल गायकवाड, खा डॉ शिवाजीराव काळगे, ज्येष्ठ विधीज्ञ व्यकटराव बेंद्रे, उपायुक्त पंजाबराव खानसुळे, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंग घोणे, माजी सभापती अँड दिपमठपती,ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते विश्वनाथ इंगळे,ओमप्रकाश आर्य, माजी नगरसेवक व्यकट वाघमारे,भाजपचे



संजय सोनकांबळे, मुन्ना हाश्मी, अँड विजय अवचारे ,माजी उपजिल्हा प्रमुख शंकर रांजणकर,डॉ संतुजी लाड चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अँड प्रदिपसिंह गंगणे, समरस्ता मंच शाम बलुतकर ,राजाराम काथवटे, ताहेरभाई सौदागर, सुरेश जाधव,प्रदेश सचिव अँड निशात वाघमारे श्रीकांत राजनकर ,भारत धाकपाडे, गणेश सौदागर,संपादक साईनाथ घोणे,अँड सुहास बेंद्रे, राजु बूये,प्रमोद गंगणे, किरण कांबळे, राहुल सौदागर, राजकुमार कांबळे, श्रीकृष्ण पाडे,,महेश विजापुरे, श्रीनिवास रांजणकर , रोहित रुमने, अँड परमेश्वर इंगळे, कल्पना फरकांडे ,महादेव फिसके,अनिल कांबळे, सुभाष टोपे, राजन शिंदे, शिवाजी तपासे , संभाजी कांबळे, तेजस कटाळे , महेंद्र गायकवाड, परमेश्वर इंगळे, अतिश नवगिरे, योगेश डोंगरे,डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष दिगंबर कांबळे , उपाध्यक्ष अँड इरफान शेख,स्वागताध्यक्ष दिनेश गोजमगुंडे, कोषाध्यक्ष आनंद पारसेवार ,आकाश राजनकर, बसव सेवा संघाचे अध्यक्ष बालाजी पिंपळे, जम्मालोद्दीन मणियार, श्रीकांत गंगणे, राजु बुये , विशाल पंलगे, चैतन्य फिस्के राजेश रुमणे , सागर कंटाळे, अँड यशवंत चव्हाण,सुशील साबणे, अमन घोलप, उमाकांत इंगळे , रमण इंगळे, विशाल पलंगे, गणेश जठार,आदीची उपस्थिती होती

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुद्ध भूमी फौंडेशन कल्याण आयोजित सात दिवसीय साखळी उपोषणाला उत्सपूर्त प्रतिसाद.

कल्याण / प्रतिनिधी कल्याण :– डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान कल्याण पश्चिम येथे शनिवार दि. १ मार्च २०२५ सकाळी ११ वाजेपासून महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुद्ध भूमी फौंडेशन कल्याण आयोजित सात दिवसीय साखळी उपोषणाला उत्सपूर्त प्रतिसाद लाभला.कल्याण येथे ७ दिवशीय धरणा प्रदर्शन आणि साखळी उपोषणाला सुरुवात झाली.महाबोधि महाविहार मुक्ती साठी कल्याण येथे आयोजित सात दिवसीय साखळी उपोषण कार्यक्रमात आज पहिला दिवशी बऱ्याच जणांनी स्व:स्फुर्त भाग घेऊन उपोषण पाळले. अनेक जणांनी संयोजन नियोजनात राहून श्रमिक दान,आर्थिक दान दिले. महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुद्ध भूमी फौंडेशन कल्याण आयोजित सात दिवसीय साखळी उपोषणकर्तेगणांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की,रेल्वे तिकीट रिझर्वेशन किंवा अन्य बऱ्याच कारणास्तव आपण लगेच बुद्धगयेला जाऊ शकत नाही, त्यामुळे आम्ही बैचेन झालो होतो, परंतु पूज्य गौतमरत्न भंतेजींनी आम्हाला आज उपोषण करण्याची सुवर्णसंधी प्राप्त करून दिल्याबद्दल महाविहार आंदोलनासाठी आम्ही काहीतरी करू शकलो, त्याचे आम्हाला तात्पुरतं समाधान वाटत आहे. अनेक धम्म उपासक उपासिका यांनी नांवे दिली होती. परंतु जो प्रथम आला त्याला विचारपीठावर बसायला मिळाले बाकी धम्म उपासक उपासिका खाली बसले. दुसऱ्या दिवशी रविवार दि. ०२/०३/२०२५ पहिला दिवसाप्रमाणे दुसऱ्या दिवसासाठी सुद्धा बऱ्याच जणांनी उपोषणा करिता नाव नोंद केली होती.धम्म उपासक उपासिका यांना विचारपीठावर बसण्यास मिळाले. बुद्धगया प्रकरण आपल्यासाठी सर्वोच्च अस्मितेच्या विषय असल्याने आपण अति महत्त्वाचा खाजगी कामाव्यतिरिक्त उपोषणात शामिल होने पासून वंचित राहू नये.बौद्धांचे सर्वात प्रधान वजूद आपल्याकडून मिठवले जात आहेत, मग आपण घरी बसून व्हाट्सअप,फेसबुक,इंस्टाग्राम वर बुद्धगयेतील व्हिडिओ बघणे सोबतच फिल्डवर येऊन काम करावे लागेल,असे निर्धार करा. बुद्धगयेला नाही जाऊ शकलो तरी आपापले विभागातील धम्म उपासक उपासिका यांची शांततेच्या मार्गाने किती संघशक्ती आहे ते आपण दाखवून देण्यासाठी संघटित झाले पाहिजे. बुद्धगया येथील फक्त सुमारे २५ बौद्ध भिक्षू यांनी शांततेच्या मार्गाने उपोषण करून त्यात किती ताकद आहे ते जगाला दाखवून दिलेले आहे. त्यांनी आज भारतातील सर्व बहुजन,आंबेडकरी व बौद्ध धम्म उपासक उपासिका यांना जागा केले आहे.लोकांना आंदोलीत केले आहे. तरी ८ मार्च पर्यंत चालणारे साखळी उपोषण कार्यक्रमात अत्यावश्यक वैयक्तिक काम नसल्यास उपोषण स्थळी सहकुटुंब मित्रमंडळीसह अवश्य उपस्थित रहावे असे पूज्य भनते गौतम रत्न यांनी जाहीर आवाहन केले आहे. तिसऱ्या दिवशी दोनशे धम्म उपासक उपासिका यांनी नांवे दिली होती पण विचारपीठावर जास्त लोक बसू शकत नाही. परंतु कल्याण शहरा लागत असलेल्या शहरांना माहिती मिळताच कल्याण येथील उपोषण व धरणे





प्रदर्शन तीव्र होत आहे.कोणी आमरण उपोषण करण्यास तयार होत आहेत, कोणी सातही दिवस उपोषण करण्याचा निर्धार करीत आहे.काल रविवार होते म्हणून पूर्ण मंच उपोषणकर्त्यांने भरून गेला होता. आज सोमवार वर्किंग डे असल्याने बहुतेक कमी लोकं उपोषणाला बसतील असे वाटत होते,परंतु काल पेक्षाही आज जास्त लोकं बसले. आता चौथा दिवसाचे उपोषणासाठी आज अपेक्षाही तिप्पट धम्म उपासक उपासिकांनी नाव नोंद केली आहे.भांडुप विभागातील धम्म उपासक उपासिका यांनी २ मार्चला लक्षवेधी धरणे आंदोलन केले होते त्यांनीही कल्याणच्या साखळी उपोषणाला भेट देऊन सहभाग नोंदविला.उल्हासनगर,बदलापूर विभागातील धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने सहभाग नोंदवीत आहेत.

अभी नही तो कभी नही.महाबोधी महाविहार ब्राह्मणमुक्त व कर्मकांड मुक्त होणारच.बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या संदर्भात कल्याण येथे चालू असलेले ७ दिवशीय साखळी उपोषण,धरणे आंदोलन व विशाल आक्रोश मोर्चासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळाची आवश्यकता होत आहे.तमाम धम्मबांधवांच्या धम्मदान निधी संकलनातून सदर कार्य संपादन होत आहे. बौद्ध धर्मीयांचे सदर सर्वोच्च विषयाला आपण प्रत्येक धम्म उपासक उपासिका यांनी दानपारमिकेचा हातभार लावावे.कृती समितीतील सर्वांच्या ठरावाने आयु.रोहित खरात यांनी त्यांच्या गुगल-पे/फोन-पे ८४१९९ १७८२० आणि स्कॅनर वापरण्यास दिले आहे. सदर स्कॅनर किंवा पॅन नंबर वर आपण दान टाकावे.बुद्धभूमीचे मुख्य ग्रुप वर सर्वांना जमा खर्चाचे तपशील मिळतील.बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन.ठिकाण: डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान, कल्याण पश्चिम.सात दिवसीय उपोषण व धरणे आंदोलन पुढील तारीख– ०४ मार्च २०२५,ते ७ मार्च २०२५ रोज सकाळी. १०:३० ते संध्याकाळी.८ पर्यन्त चालणार आहे.विशाल आक्रोश मोर्चा शनिवार दि. ०८/०३/२०२५, दु. २ वा. निघणार आहे.बौद्धांचे सर्वात महत्त्वपूर्ण अस्मितेच्या विषय असल्याने लहान मुलं सोडून अन्य एक-एक बौद्ध उपासक उपासिका यांनी वरील आक्रोश मोर्चेत सहभागी होणे अनिवार्य आहे.अधिक माहितीसाठी- भंते गौतमरत्न महाथेरो (प्रमुख मार्गदर्शक) मो.९९८७४८०३९२. यांच्याशी संपर्क करावा.

## संपादकीय....

# ट्रम्प यांचा असंस्कृतपणा

जगातील वेगवेगळ्या देशांत मतभेद असतात. कधी सीमेवरून तर कधी लष्करी, आर्थिक वा परराष्ट्र धोरणावरून त्यांच्यात वाद होतात. पण ते मिटवण्यासाठी एकत्र यावे लागते. म्हणूनच एकेकाळी रशिया-जपान युद्ध थांबवण्यात अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट यांनी यश मिळवले व त्याबद्दल त्यांना नोबेल पुरस्काराने गौरविले गेले. हिटलरच्या विरोधातली फळी मजबूत करण्यासाठी कट्टर कम्युनिस्टविरोधी असूनही ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल यांनी सोव्हिएत युनियनचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष स्टॅलिन यांच्यासोबत आघाडी करण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्यासाठी त्यांनी त्यांच्याशी वाटाघाटी केल्या. १९६१ मध्ये अमेरिकेने क्युबाच्या विरोधात चालवलेल्या मोहिमेमुळे पेचप्रसंग उद्भवला. त्यामुळे जगात तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडते की काय, अशी भीती निर्माण झाली होती. पण त्याचवेळी अमेरिकेचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांनी सोव्हिएत रशियाला क्युबामधून क्षेपणास्त्रे मागे घेण्यास भाग पाडले आणि संभाव्य युद्ध टाळले. एवढेच नव्हे, तर १९६३ मध्ये रशिया व ब्रिटनशी मर्यादित अण्वस्त्र चाचणीबंदी करार करण्यातही यश मिळवले. अखंड सोव्हिएत रशियाचे अखेरचे नेते मिखाईल गोर्बाचोव्ह यांनी अमेरिका व सोव्हिएत रशियातील शस्त्रस्पर्धेचा अंत घडवण्यासाठी धाडसी निर्णय घेतले आणि सुसंवादाचा मार्ग पत्करला. मात्र आंतरराष्ट्रीय राजकारणातील या सुसंस्कृत परंपरेचे कोणतेही ज्ञान व भान नसलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प युद्धखोर, हेकेखोर, अविचारी नेते आहेत.

आंतरराष्ट्रीय राजकारणातील सर्व प्रकारची सभ्यता आणि संकेत त्यांनी गुंडाळून ठेवले. एखाद्या लहान देशाच्या बेबंद हुकूमशहाने वागावे, तसेच ते वागत आहेत. आपल्या देशात आलेल्या पाहुण्याला कसे वागवावे, हेही त्यांना समजत नसावे! त्यामुळेच रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी ट्रम्प प्रभावी मध्यस्थी करतील, अशी अपेक्षा ठेवून गेलेल्या युक्रेनचे झेलेन्स्की यांना जाहीरपणे दमदाटी करण्यात आली. अमेरिका व व्हाईट हाऊसच्या इतिहासात प्रथमच एका अन्य देशाच्या राष्ट्रप्रमुखाला उद्धामपणाची वागणूक दिली गेली. धक्कादायक म्हणजे, ट्रम्प-झेलेन्स्की बैठकीचे जाहीर प्रसारण झाल्यामुळे या अपमानजनक वर्तणुकीचे दर्शन अवघ्या जगाला झाले. वास्तविक झेलेन्स्की यांनी वस्तुनिष्ठपणे भूमिका मांडली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी २०१४ मध्ये युक्रेनमधील क्रिमिया हा भाग ताब्यात घेतला, तेव्हा अमेरिकेने त्याला विरोध केला नव्हता. २०१४ ते २०२२ दरम्यान रशिया-युक्रेन सीमाभागात लोक मारले जात असताना कोणीही रशियाला रोखले नव्हते. २०१९ मध्ये युक्रेनने पुतिन तसेच फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि जर्मनीच्या तेव्हाच्या चॅन्सलर अँजेला मर्केल यांच्यासोबत वाटाघाटी करून युद्धबंदीचा करार केला. पण रशियाने तो मोडला. झेलेन्स्की यांनी ही वस्तुनिष्ठ माहिती दिल्यानंतर, अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी त्यांना आमचा अनादर करू नका, असे बजावले. खरे तर यात अनादराचा मुद्दाच नव्हता. त्यानंतर ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यावर, 'आम्ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत. आता तुमची स्थिती फार चांगली नाही. तुम्ही स्वतःच परिस्थिती बिघडवली आहे', असे सुनावून त्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. 'तुम्ही लक्षावधी लोकांचे जीव धोक्यात घालत आहात. त्यामुळे तिसरे महायुद्ध होईल. हे युद्ध युक्रेनमधून इस्रायलमध्ये आणि पुढे आशियात पसरेल', अशी भीतीही ट्रम्प यांनी व्यक्त केली. युद्धबंदी करारासाठी रशियासोबत वाटाघाटी करताना युक्रेनला नमते घेण्याशिवाय पर्याय नाही, असेही ट्रम्प म्हणाले. मात्र त्यांच्या एकतर्फी भूमिकेमुळे नाराज झालेल्या झेलेन्स्कींनी, 'रशिया हा मारेकरी असून, त्याच्याशी कोणतीही तडजोड मान्य नाही', असे तडफदार उत्तर दिले आणि या चर्चेतून ते बाहेर पडले.

अन्य देशाच्या पाहुण्यास बोलावून माध्यमांसमोर अपमानित करण्याची ट्रम्प यांची ही रीत जगावेगळीच मानावी लागेल. शिवाय 'युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्ध मी एका दिवसात संपवेन', अशा वल्गना ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारात केल्या होत्या. त्यांच्या अशा वागण्यामुळे हे युद्ध संपण्याऐवजी ते भडकण्याचीच शक्यता दिसते. तसेच युक्रेनने रशियासमोर लोटांगण घालावे, अशी अमेरिकेची अपेक्षा दिसते. खरे तर रशियाने युक्रेनवर आक्रमण केले असून म्हणूनच रशियाने माघार घ्यावी आणि दादागिरीची भूमिका सोडून वाटाघाटी कराव्यात, असे ट्रम्प यांनी सांगितले पाहिजे. वास्तविक युक्रेन व रशिया यांनीही याबाबतीत मवाळ भूमिका घेऊन देवाण-घेवाणीची तयारी दर्शवली पाहिजे. रशियाच्या ताकदीपुढे युक्रेन टिकू शकणार नाही. पण रशियाच्या आक्रमणवादी भूमिकेचे समर्थन केल्यास उद्या पुतीन युक्रेनसह अन्य काही युरोपीय देशांचाही घास घेऊ शकतात. म्हणूनच पुतीन यांना रोखण्याची हिंमत अमेरिकेने दाखवणे गरजेचे आहे. युक्रेन समस्येबाबत चर्चा करण्यासाठी ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी लंडनमध्ये युरोपीय देशांच्या नेत्यांची शिखर परिषद आयोजित केली होती. ट्रम्प यांच्याशी खणाखणी झाल्यानंतर झेलेन्स्की तेथून निघून थेट लंडनला पोहोचले, तेव्हा त्यांचे तेथे शाही स्वागत झाले. रशियाने सुरू केलेले बेकायदा युद्ध संपवावे आणि युक्रेनचेही भवितव्य सुरक्षित राहावे, यासाठी शस्त्रसंधी योजना आखण्यावर ब्रिटन, फ्रान्स आणि युक्रेनमध्ये सहमती झाली. रशिया एकीकडे शांततेविषयी बोलत असताना, दुसरीकडे तो सातत्याने हल्लेही करत असल्याची टीका या परिषदेत करण्यात आली. युद्धबंदीचा करार झाल्यास त्याबाबत अमेरिकेचीही संमती घ्यावी लागेल. मात्र युद्ध तात्पुरते थांबवले जाईल आणि पुतीन पुन्हा आक्रमण करतील. हे पूर्वीही घडले आहे अशी शक्यता स्टार्मर यांनी व्यक्त केली. पण किमान सर्वांना सोबत घेण्याची भूमिका तरी लंडन परिषदेत मांडण्यात आली. शांततावादी व्यापक भूमिका घेतल्याशिवाय कोणतेही युद्ध संपत नसते.

# भाजपचा मोर्चा पंजाबकडे!

दिल्लीत मिळालेल्या अभूतपूर्व यशामुळे भाजपच्या पंखांना भारतभ्रमणाचे वेध लागले आहे. भाजपच्या अश्वमेधाने आपला मोर्चा आता पंजाबच्या दिशेने वळविला आहे.

एकेकाळी भाजपसाठी 'भाजपा के तीन काम- मिटींग, भोजन और विश्राम' असं म्हटलं जायचं. मात्र, ही म्हण आता इतिहासजमा झाली असून भाजप निवडणूक लढण्यासाठी चोवीस तास अलर्ट मोडमध्ये असतो. दिल्लीतील पंजाबी आणि शीख बांधवांनी ज्या प्रकारे भाजपाला पाठिंबा दर्शवित राज्याच्या कारभाराची किल्ली भाजपच्या हाती दिली. त्यानंतर पंजाब जिंकण्याचा विचार मनात येणे स्वाभाविक आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या विजयात शालीमारबागमधील पंजाबी लोकांचा वाटा खूप मोठा आहे. पंजाबी नेत्यांनी गुप्ता यांच्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन पंजाबी लोकांना केले होते. त्याचा परिणामसुद्धा दिसून आला. यानंतर भाजपनेसुद्धा रेखा गुप्ता यांच्या सरकारमध्ये मनजिंदर सिंग सिरसा आणि आशिष सूद यांचा मंत्रिमंडळात समावेश करून पंजाबची मुहूर्तमेढ रोवली. भाजप पंजाबी नेत्यांचा आदर सन्मान करण्यात कुठेही कमी पडणार नाही अशाप्रकारचा संदेश भाजपने दिला. खरं सांगायचं म्हणजे, वर्ष २०२५ सुरू आहे आणि पंजाबमध्ये २०२७ मध्ये निवडणूक होणे आहे. तरी पंजाबची तयारी खूप लवकर सुरू केली गेली असं म्हणता येईल. मात्र भाजपने आपल्या कामकाजाची पद्धत बदलली आहे. २०२९ मध्ये होणार्या लोकसभा निवडणुकीची तयारी २०२४ चा निकाल लागल्याच्या काही दिवसांनंतरच सुरू केली. नेत्यांना जबाबदार्या वाटून देण्यात आल्या आहेत. या हिशेबाने, पंजाब विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करायला भाजपने उशीरच केला, असं म्हणावे लागेल.

मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच मनजिंदर सिंग सिरसा यांनी श्री दरबार साहिब येथे जाऊन दर्शन घेतले. याचवेळी पंजाबमधील विधानसभेची आगामी निवडणूक भाजप अकाली दलाच्या पाठिंब्याशिवाय स्वबळावर लढणार असल्याचे संकेत सिरसा यांनी यावेळी दिले. मात्र नंतर हे आपले वैयक्तिक मत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. पण सिरसा यांच्या या विधानामुळे पंजाबमधील नेत्यांना स्वबळावरील सत्तेचे डोहाळे नक्कीच लागले आहेत.

पंजाबमधील अकाली दलाचे नेते हे सिरसा यांच्या वक्तव्याकडे कसे पाहतात? हा एक वेगळा विषय आहे. परंतु, सिरसा यांचे हे विधान ऐकून अकालीला आनंदच झाला असेल. कारण, गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाने अकाली दलाचे पानिपत केले आहे. अशात, राज्याच्या सत्तेत पुन्हा परत यायचे असेल आणि त्यात भाजपचा हातभार लागत असेल तर अकाली दलासाठी ही लॉटरी लागली असेच म्हणावे लागेल.

दुसरीकडे, पंजाबमधील भाजपच्या नेत्यांनी अकाली दलाशी युती संपवून स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी केली आहे आणि शहरांपाठोपाठ त्यांना गावांमध्येही यश मिळण्याची आशा आहे. सिरसा यांनी आणखी एक गोष्ट केली जी पंजाबवासीयांच्या मनात भाजपला जागा करून देईल. ती म्हणजे, सिरसा यांनी पंजाबी या आपल्या मातृभाषेत शपथ घेतली. पंजाबी माणूस आपल्या भाषेपासून लांब जात आहे, अशी एकप्रकारची भावना निर्माण झाली आहे. घरात मुलांशी इंग्रजी किंवा हिंदीमध्ये संभाषण केले जात आहे. अशात मनजिंदर सिंग सिरसा यांनी मातृभाषेतून मंत्रिपदाची शपथ घेऊन पंजाबी लोकांच्या मनात मातृभाषेविषयी प्रेम वाढविण्याचा सल्ला दिला आहे.

सिरसा यांच्या या पावलाचे पंजाबी हेल्पलाइन आणि पंजाबी भाषेचा प्रचार करणार्या इतर संस्थांनी स्वागत केले आहे. दिल्ली शीख गुरूद्वारा व्यवस्थापन समितीचे सरचिटणीस जगदीप सिंग काहलो आणि धर्मप्रचार मुखर्जी जसप्रीत सिंग करमसर यांनीसुद्धा याचे स्वागत केले आहे. दोन्ही नेते सिरसा यांच्या शपथविधी समारंभाला कुटुंबासह उपस्थित होते. गेल्या १२ वर्षांत पंजाबी भाषेचे दिल्लीत झालेले नुकसान या सरकारमध्ये भरून काढले जाईल आणि पंजाबींना त्यांचा सन्मान पुन्हा मिळेल, असे आश्वासनसुद्धा त्यांनी दिले. थोडक्यात, भाजपने आपला मोर्चा पंजाबकडे वळविला आहे. अशात, आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल कोणती भूमिका घेतील? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण, मुख्यमंत्रिपदाची धुरा हाती घेताच रेखा गुप्ता यांनी आप सरकारच्या काळातील कॅगचे अहवाल एक-एक करून विधानसभेत मांडायला सुरुवात केली आहे. दिल्लीच्या सत्तेतून पायउतार झाल्यापासून केजरीवाल दिसेनासे झाले आहेत. शिवाय, दिल्लीच्या पराभवानंतर आम आदमी पक्षाच्या अडचणी वाढत आहेत.

## २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी तरीही स्वत:ला लोकप्रतिनिधी म्हणतात,हे चाल्लय तरी काय!

सध्या सर्वोच्च न्यायालयात दोषी राजकारण्यांवर आजीवन निवडणूक लढण्यावर बंदी असावी याकरीता जनहित याचिकेवर सुनवायी सुरू आहे.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत.यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत,तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे.यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत,तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत.ही आश्चर्य व्यक्त करणारी व धक्कादायक बाब आहे. देशाची १४० कोटी जनसंख्या आहे त्यातील जर ४६ टक्के खासदार गुन्हेगार प्रकरणामध्ये दोषी असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सध्याच्या परिस्थितीत २५१ खासदार दोषी आहेत म्हणजेच हे देशाच्या ६४ कोटी जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.हीबाब स्वतंत्र भारतासाठी काळीमा फासणारी नाही का? गुन्हेगारीतुन आलेले खासदार जर देशाचे प्रतिनिधित्व करीत असेल तर हे देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.यामुळे देशाच्या लोकांना चिंता आहे की,देशाचे ४६ टक्के गुन्हेगारीने दोषी असलेले खासदार सर्वसामान्यांना खरोखरच न्याय देऊ शकेल काय?हा मोठा प्रश्न आज १४० कोटी जनते समोर उपस्थित होतो.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, अशा खासदारांच्या क्षेत्रात गुन्हेगारीला जास्त वाव दिला तर जात नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो.ज्या ठिकाणी गुन्हेगारीला चालना मिळते अशा क्षेत्रात गुन्हेगार खासदार निवडून आले असावेत असाही प्रश्न निर्माण होतो.परंतु अशा लोकसभा क्षेत्रातील सर्वसामान्यांचे कीती हालबेहाल व अन्याय होत असतील हे सांगणे मात्र अत्यंत कठीण आहे.२०१९ मध्ये गुन्हेगारीने बरबटलेले खासदार ४३ टक्के होते आता ती संख्या वाढुन २०२४ मध्ये ४६ टक्यावर येवून पोहोचली आहे.तरीही स्वतःला स्वच्छ, निस्वार्थी आणि चांगल्या प्रतिमेचे समजतात ही अत्यंत गंभीर बाब आहे.दोषी राजकारणी दोषमुक्त झाले असले तरी त्यांच्या रक्तात दोष अवश्य दिसून येईल.त्यामुळे दोषी राजकारण्यांना राजकारणातुन जळामुळासकट बाहेर करने अत्यंत गरजेचे आहे.गुन्हेगारीमध्ये दोषी राजकारण्यांचा आपण जर देशातील राज्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर १० राज्यातील तब्बल ५० टक्के खासदार गुन्हेगार क्षेत्रातुन आले आहेत अशाने गुन्हेगारीवर कसाकाय आळा बसेल हाही गहन आणि गंभीर विषय निर्माण होतो.देशाला गुन्हेगारीतुन मुक्त करायचे असेल तर सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांचा प्रवेश वाढला तर देशात हजारोंच्या संख्येने वाल्मिक कराड सारखे गुन्हेगार निर्माण होतील व प्रशासनाला गुन्हेगारीवर आळा घालण्यास मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. या संपूर्ण बाबी लक्षात घेता सरकारने कठोर पाऊल उचलने गरजेचे आहे.कारण गुन्हेगारांची परिभाषा गुन्हेगारीमध्येच गणल्या गेली पाहिजे व त्यांची जागा त्यांना दाखविली पाहिजे असे मला वाटते.स्वच्छ व निर्मळ प्रशासन अंमलात आणण्यासाठी सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर कठोर कारवाई करून त्यांना लोकप्रतिनिधी पदावरून हटविणे गरजेचे आहे. कारण अशा प्रवृत्तींच्या लोकांनी जबाबदार पदावर पदावर रहाने म्हणजे देशाचा अपमान समजल्या जाईल.जय हिंद!

*********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# आंबेडकरी राजकीय चळवळ आणि साहित्यिकांचे योगदान.

सध्या आंबेडकरवादी,आंबेडकरी विचारधारा...वगैरे शब्द सर्वांच्या ओळखीचे झालेत.असे शब्द वापरणारे मग आपल्याच विचारसरणीचे आहेत असं वाटून जातं. कारण असे जड शब्द वापरणारे लोक आंबेडकरी विचारधारा असे नाव असलेला व्हाट्सअप गृप करतात.त्यावर अधून मधून,येथे कोणतीही गुड मॉर्निंग गुड इव्हिनिंग चे मेसेज तसेच विनोद टाकू नये अशा शिस्तबद्ध शब्दात सूचना देतात.मग ही शिस्त बघून गृपच्या डमिन चं खूप कौतुक वाटतं.काही दिवसांनी लक्षात येतं,की अरे ही तर महाविकास आघाडीची पैदास आहे.पण ही पैदास शरद पवारांची उबठा,की इंदिरा काँग्रेसची हे निश्चित करायला मार्ग नाही.

ग्रुपचं नाव आंबेडकर विचारमंच,आंबेडकरवादी विचारधारा.... वगैरे काही असलं तरी यांना महाविकास आघाडीच सत्तेत येण्याची स्वप्न पडतात.काही दिवसांपूर्वी मी आंबेडकरी चळवळीसाठी सर्वस्व अर्पण करा हा लेख लिहिला.त्यात अर्थातच आंबेडकरी राजकीय चळवळीतून बाहेर पडून जे भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षात गेलेत त्या फळपुट्या रिपब्लिकन नेत्यावर संताप व्यक्त केला.आणि लगेच रिपब्लिकन नेत्यांवर आगपाखड करू नये असं मला सांगण्यात आलं.काँग्रेसमध्ये काम करणाऱ्यांना नावे ठेवू नका अशी ही प्रेमळ सूचना केली.माझ्यावर बसपा समर्थक कांशीराम चेला वगैरे सिक्का मारला गेला.मी त्यांना विचारलं तुमचा राजकीय पक्ष कोणता? मागील निवडणुकीत तुम्ही कोणाला मते दिलीत? यापैकी दुसऱ्या प्रश्नाचं थेट उत्तर द्यायचं त्यांनी टाळलं. पहिल्या प्रश्नाचे उत्तर दिलं ते अतिशय चिड आणनारं होतं. सध्या आम्ही कोणत्याही राजकीय पक्षात काम करत नाही असं ते उत्तर होतं जी लोकं असे उत्तरं देतात ती लोकं स्वतःला आंबेडकरवादी,आंबेडकरी विचारधारेचे...मानतात. हे ढोंगी माणसं असतात.असं उत्तर देणारी माणसं ही आंबेडकरवादी विचारधारेची नसतात.ही माणसं या विचारधारेला लागलेली कीड असते.ही माणसं आंबेडकरी विचारधारा जोपासणारी नसतात तर या विचारधारेच्या विरोधी असतात.

माझ्यामते आंबेडकरी चळवळीचे सांप्रत स्थितीत चार भाग पडायला हवेत.धार्मिक चळवळ,सामाजिक चळवळ,आर्थिक चळवळ आणि राजकीय चळवळ.बाबासाहेबांनी सत्ता ही सर्व समस्यांची चाबी आहे असं सांगितलं आहे.त्यामुळे त्यांनी राजकीय पक्षाची संकल्पना मांडली.कृषक मजदूर पक्ष आणि शेड्यूल कास्ट फेडरेशनच्या नावाने राजकारणही केलं.सत्तेचं महत्त्व पटलं तरी ते घाईघाईने काँग्रेसमध्ये गेले नाही.सत्तेत आपला समाज म्हणजे ५९ जाती स्थिर व्हाव्या म्हणून स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. राजकीय आरक्षण दिले.स्वतः दोन वेळा निवडणूक हरले तरी काँग्रेसमध्ये गेले नाही.आज आंबेडकरी विचारधारा सांगणारे लोक,आम्ही कोणत्याही पक्षाशी संबंधित नाही म्हणणारे लोक कुणासाठी काम करतात? या प्रश्नाचे वेगळे उत्तर देण्याची आवश्यकता नसावी.दलितांवरील अन्याय अत्याचार संपवायचा असेल तर सर्व आंबेडकर वाद्यांनी आणि आंबेडकरवादी जनतेने खोकेवाले सरकार खाली खेचले पाहिजे,राज्यात चत- चे सरकार स्थापन होईल अशी अपेक्षा आहे असे विचार आंबेडकरी विचारधारा सांगणारे सांगतात.त्यामुळे हे आंबेडकरवादी नाही तर हे काँग्रेस,उबाठा आणि शरद पवार वाले आहेत.अशा संधीसाधू लोकांनी आंबेडकरी राजकीय चळवळ संपविण्याचे कार्य हाती घेतले आहे.

आंबेडकरी राजकीय चळवळ अस्तित्वात आल्यापासूनच अशा बेईमानांची एक मोठी फळी काँग्रेसच्या तंबूत दाखल झाली. आपल्यावरील अन्याय अत्याचार संपविण्यासाठी बाबासाहेब काँग्रेसच्या दरबारात कधीही फिरकले नाही. मात्र स्वतःला बाबासाहेबांचे अनुयायी म्हणणारे आपल्या प्रत्येक समस्येचं उत्तर काँग्रेसकडे शोधतात. आणि तरीही स्वतःला आंबेडकरी विचारधारेचे मानतात. का ? कारण बाबासाहेबांचं नाव घेतल्याशिवाय यांना काळं कुत्रही विचारत नाही.महारांची मते मिळवून दिल्याशिवाय काँग्रेसही यांची बक्षीस देत नाही.त्यामुळे पूर्वी आपला पक्ष निवडून येऊ शकत नाही त्यामुळे भाजप सत्तेत येईल हे भय निवडणूक काळात पेरले जायचे.आता घटना वाचवायची असेल तर काँग्रेसला आणि उबाठा तसेच पवारांना म्हणजे शरद पवारांना एकूणच चत-ला मते दिल्याशिवाय पर्याय नाही असे भय आंबेडकरी जनतेत पेरले आहे.आणि पेरणी सुरूच आहे.पण संविधान वाचविण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन काँग्रेसचे ओझे वाहण्यापेक्षा या जबाबदारीतून आणि काँग्रेसच्या ओझ्यातून आंबेडकरी जनतेने मुक्त झाले पाहिजे.कारण संविधान हे सर्वांसाठी बनलेले आहे.त्याचे मोल राजकीय पुढार्यांना अधिक आहे.सततचा सत्तापालट आणि या पक्षातून त्या पक्षात नेत्यांची वर्दळ वाढलेली आहे.ती फक्त सत्तेसाठी आहे.या देशातील संविधान संपवून हुकूमशाही कडे वाटचाल सुरू आहे आणि जनमत तशाच दिशेने चालले आहे असं वाटण्याचं कारण नाही.तसं असतं तर शिवसेना फोडून एकनाथ शिंदे भाजपात जाऊन मुख्यमंत्री झाले नसते. अजित पवारांनी काकांशी दगाबाजी करून उपमुख्यमंत्री पद भोगले नसते.

भाजप राष्ट्रवादी काँग्रेस अशा कोलांट उड्या मारणारे लोक सत्ता मिळविण्यासाठीच ही कसरत करीत आहेत. ही शेवटची निवडणूक ती शेवटची निवडणूक आणि मग लोकशाही संपेल असा प्रचार कांग्रेसचं काम करणारे आणि स्वतःला आंबेडकरवादी म्हणवून घेणारे लोक आंबेडकरी जनतेची दिशाभूल करत आहेत.एक लक्षात ठेवा, या देशात जोपर्यंत निवडणूक प्रक्रिया आहे तोपर्यंत लोकशाही आहे.आणि ही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी नेतेही आहेत.सर्व हुकूमशाहीचे समर्थक असते तर मोदींच्या हातात सत्ता दिली असती आणि सारे निष्क्रिय झाले असते.पण सत्तेसाठी सगळ्यांचा आटापिटा चालला आहे.यात कोण पुढे गेला आणि कोण मागे राहिला या प्रश्नाच्या उत्तरात आंबेडकरी जनतेने राहू नये.यात आपण कुठे आहोत? या प्रश्नाचा शोध घेतला पाहिजे.आपले स्थान हमालासारखे नको.आणि ते नको असेल तर आपला राजकीय पर्याय उभा केला पाहिजे.आपला समाज अजूनही गुंगीत आहे तो शुद्धीवर येऊन विचार करताना दिसत नाही.त्यामुळे त्याला भाजप सेनेच्या भयाने पछाडले होते.आता २०१४ पासून तो संविधानाच्या भयाने पछाडला आहे.जादूच्या कांडीने संविधान बदलणार नाही.घटना खूप ताठर किंवा लवचिक नाही त्यात काळानुरूप काही बदल करायचे असल्यास अशी योग्य तरतूद केलेली आहे. त्या आधारावरच काँग्रेसने सर्वात जास्त दुरुस्त्या केल्या आहेत.आता सत्ता हातातून निसटतांना दिसते आहे आणि थोडा आंबेडकरी जनतेचा राजकीय पर्याय उभा राहताना दिसायला लागला तर यांना संविधान धोक्यात आल्याचे स्वप्न पडू लागले.त्यासाठी आंबेडकरी जनतेला हाक देऊन त्यांची मते मिळविण्याचा डाव काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस उबाठा आणि मित्र पक्षांनी साधला आहे.

संविधानावर प्रेम करणारे हे पक्ष मात्र स्वतःच्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत . त्यासाठी त्यांना आंबेडकरी राजकीय चळवळ संपवायची आहे.आताशा शेकड्यावर आंबेडकरी राजकीय पक्ष आहेत.पण निवडणुकीच्या मैदानात कोणीही नाही.हे सारे पाठिंबाचे अधिकारी आहेत.नामांतराच्या लढ्यातील अनेक भीमसैनिक नामांतराचे राजकारण करीत मोठे झाले.समाजाने त्यांना भरभरून प्रेम दिले. सामाजिक कार्यकर्ता ते राजकीय पुढारी असा त्यांचा प्रवास आंबेडकरी जनतेने बिन तक्रार मान्य केला.नामांतरासाठी लढणाऱ्या नेत्यांवर प्रेमाचा पाऊस पडला.आज ते सारे नेते काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस भाजप सेना असा प्रवास करून भाजप सेनेच्या विजयासाठी दोन बोटे दाखवताना दिसतात.निवडणुकीत यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही.काहींना उमेदवारच उभे करण्याची संधी भाजप शिंदे सरकारने दिली नाही.म्हणजे त्या पक्षात जाऊनही ते राजकीयदृष्ट्या बहिष्कृत आहेत. राजकारणात काहींचं पुनर्वसन झालं तर काही अजूनही अस्थिर आहेत.एकीकडे बाबासाहेबांचं नाव घेत आंबेडकरी जनतेशी धोकाबाजी करणारे हे नेते आहेत तर दुसरीकडे संविधान प्रेमी काँग्रेस राष्ट्रवादी आणि उबाठा आहे. हे गणित जरा विचित्र वाटत असले तरी आपल्या अस्तित्वासाठीच सारे प्रयत्न करत आहेत.सध्या उबाठा,राष्ट्रवादी शरद पवार आणि काँग्रेसला मोठी गळती लागली आहे.यातील अनेक नेते भाजप शिंदे कडे गेले आहेत,तर काही जाण्याच्या मार्गावर आहेत.संख्याबळाच्या कारणावरून विधानसभेत अजून विरोधी पक्ष नेता निवडला गेला नाही.मग निवडणुकीत संविधान प्रेमाने पछाडलेले हे लोक सविधान प्रेमासाठी काँग्रेसमध्ये प्रवेश का करीत नाही ? पण हे तसे करणार नाही.कारण यांचं संविधान प्रेम बेगडी आहे,असा त्याचा अर्थ होतो.त्यांचे मनसुबे कितीही जहरी असले तरी केवळ संविधानासाठी आपण आपल्या मतांची किंमत न समजता यांच्या बहकाव्यात जातो.

कोणतीही चळवळ उभी करायला साहित्यिकांची मोठी भूमिका असते.आंबेडकरी साहित्यात अनेक नावाने संमेलने होतात.त्यात मोठ्या प्रमाणावर चरित्र,आत्मचरित्र,कविता संग्रह,नाटक,कादंबरी,वैचारिक लेख.वगैरेंची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली.या निर्मितीचा आणि त्या साऱ्या साहित्यिकांचं मनापासून स्वागत आहे. कौतुक आहे.पण साहित्यिकांनी राजकीय चळवळीसाठी फार मोठे योगदान दिल्याचे दिसून येत नाही.२०१४ पासून आपले साहित्यिक बऱ्यापैकी धास्तावलेले आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत संविधान वाचविण्यासाठी महाविकास आघाडीला मते देण्यासाठी विनंती करणारा मजकूर सोशल मीडियावर बराच फिरताना दिसून आला होता.त्या मजकुराखाली अनेक नामवंत साहित्यिकांची विनीत म्हणून नावे होती.आणि कुणीही या मजकुराशी माझा संबंध नाही असा खुलासा केला नाही. म्हणजे त्यांनी आंबेडकरी जनतेला महाविकास आघाडीला मत देण्याची विनंती केली होती,असा सरळ अर्थ होतो.काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस किंवा त्यांच्या मित्रांनी एकत्र येऊन आंबेडकरी राजकीय चळवळीला संपविण्याचा आणि त्या मतावर आपला हक्क सांगण्याचा कावा आपण समजू शकतो. पण आपल्या साहित्यिकांनी त्यांची पाठराखण करणे हे अनाकलनीय आहे.किंवा मागेपुढे आपला सत्कार आणि पुरस्कार देणारे हेच पक्ष आहेत असं ते समजून आहेत का? काही लेखकांनी प्रकाश आंबेडकरांची बाजू मांडली. त्यांना अंदभक्त वगैरे नाव ठेवण्यात आले.आंबेडकरांनी युती केली नाही असे अनेकांनी सांगितले.का केली नाही? हे कोणीही सांगितले नाही.

स्वतः प्रकाश आंबेडकरांनी त्यांची बाजू प्रसार माध्यमांकडे मांडली आहे.पण चत- च्या प्रेमात आंधळे झालेल्या कार्यकर्त्यांना आणि साहित्यिकांनाही ते बघता आले नाही.शेवटी मी बसपाचा कार्यकर्ता होतो.बसपावर ,बहन मायावती वर आणि मान्यवर कांशीरामजी यांच्यावरील टीका मला आजही आवडत नाही.पण महाराष्ट्रात बसपाचा म्हणावा तसा जोर नाही. आणि सध्या सर्व आंबेडकरवादी राजकीय पक्ष दुसऱ्यांच्या वळचणी खाली मजा मारतायत.अशात प्रकाश आंबेडकर हे आपली राजकीय चळवळ पुढे रेटत आहेत.आणि त्यांच्या मागे समाज आहे.ज्यांच्या मागे समाज आहे तेच आता ऐक्य आहे दुसऱ्या कोणत्याही ऐक्याच्या फालतू फाजील गोष्टी करीत बसण्यापेक्षा प्रकाश आंबेडकर यांच्या मागे आपण भक्कमपणे उभे राहिले पाहिजे.काळ वेळ परिस्थितीत आपण बदलू शकलो पाहिजे.सध्या तरी आपण लोकशाही मानत असलो तर समाजाचा अधिक कल प्रकाश आंबेडकरांच्या दिशेने जातो.त्यात बहुजन समाजही त्यांच्या पाठीशी बऱ्यापैकी उभा आहे.म्हणून समाजाचा नेता प्रकाश आंबेडकरच आहेत असं म्हणायला हरकत नाही. महाविकास आघाडीशी मैत्रीपूर्ण आणि सन्मानपूर्वक युती झाली तरच आंबेडकरी जनतेने महाविकास आघाडीला मते द्यावीत.अन्यथा आपली बहुमूल्य मते प्रकाश आंबेडकरांच्या पक्षालाच दिली पाहिजेत. कारण निवडणुकीच्या रणांगणात ते एकटेच शस्त्र घेऊन उभे आहेत. बाकीच्यांनी आपली शस्त्र टाकून दिलीत.आणि हुजरे म्हणून शिल्लक राहिले आहेत. त्याचबरोबर साहित्यिकांनी आपली लेखणी सतत झिजवत राहायला हवी.कारण परिवर्तनाच्या प्रक्रियेत साहित्यिकांचे नेहमीच मोठे योगदान राहिले आहे.आंबेडकरी राजकीय चळवळ तग धरण्यासाठी साहित्यिकांचा मोठा वाटा अपेक्षित आहे.

*******

राजू बोरकर
७५०७०२५४७६
मु.पो.ता.लाखांदूर,जि.भंडारा

# पँथर म्हणजे नुस्ता राडा नव्हे!

असं म्हणतात राडे करणाऱ्यांचा वरचा मजला रिकामा असतो.पण पँथर्स याला एकमात्र अपवाद होते आणि आहेत. भाई संगारे,मनोहर अंकुश,नामदेव ढसाळ, राजाभाऊ ढाले हे फक्त डॅशिंग नेते नव्हते तर ते वैचारिक डॅशिंग नेते होते. या साऱ्यांची भाषणे म्हणजे प्रत्येक पँथर्स साठी एक वैचारिक डोस असायचा. आणि या नेत्यांना आदर्श मानून प्रत्येक पँथर हा जरी डॅशिंग असला तरी त्याच्या प्रत्येक कृतीला एक वैचारिक धार होती आणि आहे. गौतम जाधवही त्यातलाच एक बुध्दिमान पँथर. महालक्ष्मी रेसकोर्स समोर जी म्युनिसिपल कामगार वसाहत आहे तेथे दोन पँथर्स रहायचे. एक जयवंत कांबळे आणि त्याच्या खांद्याला खांदा देऊन सोबत असायचा गौतम जाधव. पँथरच्या प्रत्येक आंदोलनात ही जोडगोळी सर्वांच्या पुढे असायची. महानगर पालिका वसाहतीमधील प्रत्येक मुलांचे आईवडील हे सफाई कामगार असत. त्याच्यानंतर घर टिकवण्यासाठी ही मुलेही आपल्या पालकानंतर महापालिकेत सफाई कामगार म्हणून कामाला लागत. पण गौतम ह्याला अपवाद होता. शिकलेला असल्याने त्याला म्युनिसिपल बँकेत लिपिकाची नोकरी मिळाली. मग हळू, हळू आपल्या स्वतःच्या हुषारीवर गौतम त्या बँकेचा मॅनेजर झाला. मॅनेजर झाल्यावर मात्र त्याने आमच्या उठावच्या पहिल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ माकडवाल्या सावकारांवर बँकेच्या परिसरात प्रवेश करण्यावर कायदेशीर बंदी आणली. त्यामुळे अनेक गुंड सोबत बाळगणारे माकडवाले सावकार गौतमवर डुख धरुन होते. पण असल्या सावकारांना गौतमने अजिबात भिक घातली नाही. यातच त्याचं डॅशिंग पँथरपण अधोरेखित झालं होतं. जसं आमच्या चार चाळीला पूर्वी लोक 'म्हार चाळ' म्हणायचे तसेच गौतमच्या या वसाहतीला इतर लोकं पूर्वी 'कचरपट्टी' किंवा 'भंगीवाडा' म्हणत. पण पँथर जन्माला आली आणि या वसाहतीला लोकं 'गौतम नगर' म्हणू लागले. याचं एकमेव श्रेय पँथरला अर्थात पर्यायाने गौतम व जयवंत सारख्या हरेक पँथर्सना जातं. जसा जयवंत कांबळे कुणापुढे लाचार न होता मरेपर्यंत ताठ मानेने पँथर राहिला. तसाच गौतम जाधवही 'भारतीय दलित पँथर' न बनता फक्त दलित पँथरचाच पँथर बनून राहिला. अशा या स्वाभिमानी पँथरची पुण्यानुमोदन व शोकसभा बुधवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडे ठद्भज ऑफिस जवळील ताडदेव येथील जनता केंद्रात आयोजित करण्यात आली आहे. या पँथरला निळा सॅल्युट द्यायला आपण सगळे येणारच आहात ही खात्री आहेच. जयभीम!

विवेक मोरे
८४५१९३२४१०,मुंबई.

## लातूर शहरातील नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेस पक्षाचे मनपा प्रशासना विरोधात घंटानाद आंदोलन








लातूर / प्रतिनिधी : – लातूर शहरातील नागरिकांच्या विविध मागण्या वेळोवेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदना द्वारे प्रशासनास सोडविण्या बाबत विनंती करण्यात आली. परंतु महानगरपालीका प्रशासनाच्या वतीने कोणतीच ठोस कार्यवाही व उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, त्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही, त्यामुळे महानगरपालीका प्रशासन सर्वसामान्यांच्या प्रश्ना बाबत झोपेचे सोंग घेत असल्याने सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने घंटा नाद आंदोलना करून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या सूचने नुसार राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याची माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने मंगळवार, दि. ४ मार्च २५ रोजी सकाळी १० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, मेन रोड लातूर येथे सर्वसामान्यांच्या प्रश्ना बाबत झोपेचे सोंग घेणाऱ्या महानगरपालिका प्रशासना विरुद्ध घंटा नाद आंदोलन करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, लातूर शहरचे निरीक्षक जितेंद्र देहाडे, लातूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, फरीद देशमुख, माजी महापौर सौ. स्मिता खानापुरे, अभयदादा साळुंके, अशोक गोविंदपूरकर, सौ. विद्याताई पाटील, रविशंकर जाधव, गोरोबा लोखंडे, लक्ष्मण कांबळे, कैलास कांबळे, सचिन बंडापल्ले, इम्रान सय्यद, विजयकुमार साबदे, सौ सपनाताई किसवे, गणेश एसआर देशमुख, प्रवीण सूर्यवंशी व्यंकटेश पुरी, दगडूअप्पा मिटकरी, आतिष चिकटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर शहरातील विविध समस्या बाबत मनपा आयुक्त यांना निवेदन देऊन घंटानाद आंदोलन करण्यात आला. या निवेदनात लातूर शहरात विविध ठिकाणी भूमिगत गटारीचे काम सुरू आहे संबंधित कंत्राटदार रोड फोडत आहे, परंतु काम संपल्यानंतर त्या रोडची पक्की दुरुस्ती होत नाही, त्या मुळे नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. तरी असे नादुरुस्त रस्ते पावसाळयापूर्वी दुरुस्त करण्यात यावेत. शहरात सद्या दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे त्यावर तात्काळ उपायोजना राबवून नागरिकांना पिण्याजोगे व स्वच्छ पाणी द्यावे. शहरातील विविध भागात पथदिवे बंद असल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे तरी तात्काळ पथदिवे दुरुस्तीचे काम करून घ्यावेत. शहरात मोकाट श्वान व मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरे यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी शहरात डॉग कॅनल उभे करावे आणि मोकाट जनावरांसाठी कोंडवाडा सुरू करावा. शहरांमधील वाढती रहदारी लक्षात घेता मुख्य चौकातील ट्रॅफीक सिग्नल व्यवस्थापन सुरळीत करावे. शहरातील गंजगोलाई व दयानंद कॉलेज बार्शीरोड परिसरातील फळ व भाजी विक्रेते यांना सोयीची व कायमची जागा उपलब्ध करून द्यावी. महानगरपालिका गाळे भाडे हे दिनांक ६/११/ २०२३ च्या शासन परिपत्रकानुसार आकारून वर्षानुवर्ष व्यवसाय करणाऱ्या महानगरपालिका गाळे धारकांना न्याय द्यावा, कोरोनाच्या संकट काळात सेवा देऊन शहर स्वच्छ ठेवणाऱ्या, पारितोषिक मिळवून देणाऱ्या स्वच्छता कंत्राटी कामगारांना सेवेत सामावून घेण्यात यावे. अस्तित्वात असलेल्या रस्त्यांना जोडल्याशिवाय नवीन रेखांकन मंजूर करू नये. शहरातील बऱ्याच भागातील नागरिकांना कबाले देण्यात आलेले नाहीत तरी तत्काळ कबाले देण्याची प्रकिया सुरु करण्यात यावी. यामागण्यां तात्काळ मंजूर करून सर्वसामान्य नागरिकांना न्याय द्यावा असे या दिलेल्या निवेदनात मागण्या केल्या आहेत. या घंटानाद आदोलनाज ड. देविदास बोरुळे पाटील, प्रा. प्रवीण कांबळे, अहेमदखा पठाण, सय्यद मोईनउल्ला, युनूस मोमीन, नामदेव इगे, आसिफ बागवान, दत्ता सोमवंशी, अमित जाधव, आयुब मणियार, संजय जगताप, राजकुमार जाधव, सुपर्णा जगताप, प्रवीण घोटाळे, गौस गोलंदाज, भाऊसाहेब भडीकर, सुंदर पाटील कव्हेकर, कुणाल वागज, सिकंदर पटेल, राजेश गुंठे, धोंडीराम यादव, नागसेन कामेगांवकर, कल्पनाताई मोरे, शीतल मोरे, शिंदेताई, कमलताई मिटकरी, सुलेखाताई कारेपूरकर, अभिजित इगे, अकबर माडजे, अभिषेक पतंगे, विष्णुदास धायगुडे, प्रमोद जोशी, करण गायकवाड, अक्षय मुरुळे, अनुप मलवाड, सुधीर आणवले, विकास वाघमारे, रोहित वडरुले, ड. गोपाळ बुरबुरे, रत्नदीप अजनिकर, ड. अंगदराव गायकवाड, यशपाल कांबळे, विजय टाकेकर, राज क्षीरसागर, ड.विजय गायकवाड, फारुख शेख, पवनकुमार गायकवाड, सत्यवान कांबळे, बब्रुवान गायकवाड, नबी नळेगावकर, सुरेश गायकवाड, सायरा पठाण, वाघमारेताई, तनुजा कांबळे, कमल शहापूरे, यशपाल कांबळे, पिराजी साठे, आकाश मगर, अमोल गायकवाड, धनराज गायकवाड, मुनवर सय्यद, आबू मणियार, अजीज बागवान, हमीद बागवान, तबरेज तांबोळी, संदीपान सूर्यवंशी, युनूस शेख, राहुल डूमणे ड. गणेश कांबळे, सुरज पांचाळ, नितीन कांबळे, सोमेन वाघमारे, राजू गवळी, नितीन कांबळे आदी उपस्थित होते.

## आगीच्या धुरामध्ये श्वास घेणे किती धोकादायक ठरू शकते? शरीरावर कसा होतो परिणाम, जाणून घ्या..



शुक्रवारी सकाळी दक्षिण मुंबईतील भायखळा परिसरातील एका उंच इमारतीत भीषण आग लागली. मुंबई अग्निशमन दलाच्या (एमएफबी) मते, सालसेट इमारतीच्या ४२ व्या मजल्यावर सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आग लागली, ज्यामुळे इमारतीतून दाट धुराचे लोट पसरले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी तातडीने काम सुरू केले आणि सर्व रहिवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. वीजपुरवठा खंडीत करण्यात आला, कारण इमारतीचा आतील भाग दाट धुराने व्यापलेला होता, अशी माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने द इंडियन एक्स्प्रेसला दिली. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

आगीचा धूरामध्ये श्वास घेणे किती धोकादायक ठरू शकते?

दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलमधील इंटरनल मेडिसिनचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंघला यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना स्पष्टपणे सांगितले की, आगीच्या ज्वाळा आणि धुरामध्ये श्वास घेतल्यास श्वसनसंस्थेला गंभीर नुकसान पोहचू शकते. गरम वायू आणि कण श्वसनमार्गाला त्रास देऊ शकतात, ज्यामुळे खोकला, घरघर आणि श्वास घेण्यास त्रास होतो. कार्बन मोनोऑक्साइडसारख्या विषारी वायूंमुळे चक्कर येणे, डोकेदुखी आणि अगदी चेतना नष्ट होणेदेखील होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

दीर्घकालीन गुंतागुंतींमध्ये सीओपीडी आणि दमासारखे दीर्घकालीन श्वसन रोग समाविष्ट आहेत, ज्यामध्ये फुफ्फुसांना न्यूमोनियासारख्या संसर्गाची शक्यता असते.

सर्वात जास्त धोका कोणाला आहे? डॉ. सिंघला यांनी अधोरेखित केले की, लहान मुले, वृद्ध, दमा किंवा सीओपीडी असलेली आणि धूम्रपान करणारी व्यक्ती, यांना गंभीर आरोग्य समस्या होण्याचा धोका सर्वाधिक असतो. त्यांच्या या गटांची फुफ्फुसे आधीच कमकुवत आहेत, ज्यामुळे त्यांना धुराच्या श्वासातून बाहेर पडणे कठीण होते.

धुराच्या श्वासातून बाहेर पडण्यासाठी प्रथमोपचार उपाय तीव्र श्वसनाचा त्रास टाळण्यासाठी त्वरित प्रथमोपचार अत्यंत महत्त्वाचा आहे, असा डॉ. सिंघला यांनी सल्ला दिला. बाधित व्यक्तीला ताबडतोब ताज्या आणि मोकळ्या हवेत घेऊन जा, आपत्कालीन वैद्यकीय सेवांना संपर्क साधा.

जर उपलब्ध असेल तर कार्बन मोनोऑक्साइड विषबाधा रोखण्यासाठी ऑक्सिजन द्या.

किरकोळ भाजले असल्यास थंड पाणी किंवा कोल्ड कॉम्प्रेस लावा. वैद्यकीय मदत येईपर्यंत श्वासोच्छ्वास, नाडी आणि चेतनेच्या पातळीचे निरीक्षण करा.

मुंबईत लागलेल्या आगीचे कारण अद्याप तपासात आहे आणि अधिकारी झालेल्या नुकसानीचे पंचनामा करत आहेत. रहिवाशांना सावध राहण्याचे आणि उंच इमारतींमध्ये अग्निसुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यासाठी उपाशी पोटी करा 'या' जादुई पाण्याचे सेवन,पोटावरची चरबी होईल कमी

हल्लीच्या काळात वाढलेले वजन ही सामान्य समस्या झाली आहे. वजन वाढल्यानंतर आरोग्यावर गंभीर परिणाम दिसून येतात. याशिवाय अनेक आजार होण्याची शक्यता असते. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी महिला आणि पुरुष सतत काहींना काही करत असतात. मात्र तरीसुद्धा फारसा परिणाम दिसून येत नाही. शरीरावर वाढलेली अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी आहार तज्ज्ञांकडून डाईट घेणे, तासनतास जिममध्ये जाऊन वर्कआऊट करणे इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. मात्र तरीसुद्धा वाढलेले वजन कमी होत नाही.

वजन वाढल्यानंतर मधुमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे दैनंदिन आहारात चुकीच्या सवयी फॉलो न करता शरीराला पचन होईल अशा गुणकारी पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला पोटावर वाढलेली अतिरिक्त चरबी आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यासाठी उपाशी पोटी कोणत्या पाण्याचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. घरगुती उपाय केल्यामुळे पोटावर वाढलेली चरबी कमी होऊन जाते.

वाढलेले वजन कमी करण्यासाठी 'या' काढ्याचे करा सेवन:

वजन कमी करण्यासाठी दैनंदिन आहारात चुकीच्या पदार्थांचे सेवन करण्याऐवजी शरीराला पचन होईल अशा पौष्टिक पदार्थांचे सेवन करावे. यासाठी अर्धा लिटर पाणी गरम करून घ्या. पाणी गरम झाल्यानंतर त्यात ओवा आणि बडीशेप टाकून व्यवस्थित उकळवा. त्यानंतर त्यात हळद आणि धणे घालून उकळवून घ्या. १५ ते २० मिनिटं काढा व्यवस्थित उकळल्यानंतर गॅस बंद करून काढा गाळून घ्या. काढ्यामध्ये तुम्ही मध टाकून पिऊ शकता. यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातील आणि वाढलेले वजन कमी होईल.

चयापचय वाढते:

थंडीसह इतर सर्वच ऋतूंमध्ये काढ्याचे नियमित सेवन करावे. यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. काढा प्यायल्यामुळे शरीराचे चयापचय सुधारते. याशिवाय शरीरावर वाढलेली अतिरिक्त चरबी जळून जाते. तसेच बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यासाठी नियमित काढ्याचे किंवा ओव्याचे सेवन करावे. उपाशी पोटी ओवा बडीशेपचे पाणी प्यायल्यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातील.

पोटावरील चरबीचा घेर कमी होईल:

ओवा, बडीशेप आणि हळदीच्या पाण्याचे सेवन केल्यामुळे पोटावर वाढलेली चरबी कमी होईल. याशिवाय शरीराला अनेक फायदे होतील. पोटाच्या आजूबाजूला किंवा हातांवर वाढलेल्या अतिरिक्त चरबीमुळे महिलांचा आत्मविश्वास काहीवेळा कमी होऊन जातो. त्यामुळे वाढलेली चरबी कमी करण्यासाठी इतर कोणतेही उपाय करण्याऐवजी घरगुती उपाय करावे.

# आला उन्हाळा, तब्येत सांभाळा व उष्माघात टाळा..!

लातूर, : –हवामान खात्याच्या अंदाजानुसार,सध्यावातावरणात ीलहोणाऱ्याबदलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे.त्यामुळे मार्च महिन्यापासूनच अनेक भागात तापमान वाढत आहे. जिल्ह्याच्या तापमानाचा पारा देखील वाढतो आहे. सर्व साधारणपणे एखाद्याप्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्शियसपेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे प्रामुख्याने प्रत्येक वर्षी एप्रिल, मे, जुन या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. परिणामी, उष्माघातामुळे मृत्यू होण्याची शक्यता असते.

उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक

उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती व लहान मुले, गरोदर महिला , स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती , मधुमेह, हृदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक , घट्ट कपडे घातलेले लोक, निराश्रीत, बेघर लोक , कारखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक अशा अति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका अधिक असतो. अतिजोखमीच्या लोकांनी उष्णतेच्या लाटेसंदर्भात विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाचा किंवा गंभीर स्वरूपाचा असतो.

लक्षणे

किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॅश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसतात. तर गंभीर त्रासात उष्माघातामुळे त्वचा कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो.

प्रतिबंधात्मक उपाय

हे करा

पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापरा. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापरा. ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. सरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा.

हे करू नये

कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणेटाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी, शीतपेय टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा व स्वयंपाक घर हवेशीर ठेवा.

प्रथोमचार

रुग्णास वातानुकुलीत खोलीत ठेवावे अथवा हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे, कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसपॅक लावावेत. रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे.

आरोग्य विभाग सज्ज:–

येऊ घातलेल्या उन्हाळ्यात उष्माघात प्रतिबंध व नियंत्रणाकरिता आरोग्य विभागाची पूर्वतयारी पूर्ण झालेली असून सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून आवश्यक औषधीसाठा उपलब्ध करून आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत उष्माघात होऊ नये, यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा. तसेच, उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बी. एम शिंदे यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना केले आहे.

# औसा खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध शिवसेना जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी यांचे वर्चस्व कायम



औसा :– औसा तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची पंचवार्षिक निवडणूक लागली असून या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटच्या दिवसापर्यंत प्रत्येक संचालक पदाच्या जागेसाठी प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज आल्याने व ते उमेदवारी अर्ज मंगळवारी (दि.४) वैध ठरल्याने ही निवडणूक झाली आहे. औसा तालुका खरेदी विक्री संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख संतोषभाऊ सोमवंशी यांचे या संघावर वर्चस्व कायम राहिले आहे. औसा तालुका खरेदी विक्री संघाच्या २०२५ ते २०३० या कालावधीसाठी ही निवडणूक जाहीर झाली होती. सोमवारी (दि.३ मार्च) उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. यामध्ये विद्यमान सभापती तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली १५ उमेदवाराचे उमेदवारी अर्ज आल्यामुळे निवडणूक बिनविरोध झाली. या निवडणुकीमध्ये संस्था मतदारसंघातून संतोष ज्ञानोबा सोमवंशी, शिवाजी माधवराव हांडे, मारुती गोरखनाथ मगर, नंदकुमार नानासाहेब साळुंके, गणेश प्रल्हाद जाधव तर वैयक्तिक शेतकरी मतदारसंघातून शेखर प्रल्हाद चव्हाण, महादेव शामराव पाटील, केशव तात्याराव डांगे, श्रीधर मनोहर साळुंके, बालाजी सुग्रीव धुमाळ यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले. अनुसूचित जाती जमाती मतदारसंघातून राजीव केशव कसबे, इतर मागासवर्गीय मतदार संघातून सत्यभामा गणपतराव माळी, महिला मतदारसंघातून सविता अरविंद जाधव, मायाबाई राजेंद्र साळुंके, भटक्या जाती जमाती मतदारसंघातून नवनाथ व्यंकट लवटे आदी उमेदवाराचे दाखल झाले होते. हे सर्व उमेदवारी अर्ज छाननीमध्ये वैध ठरले. यामुळे या निवडणुकीत सदरील उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या निवडीचे औसा तालुक्यातील शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात येत आहे.

# लहान मुलांच्या टीव्ही आणि मोबाईलच्या हट्टामुळे आई वडील आले अडचणीत



किनवट: शेख शौकत :–सर्वांना सारखीच समस्या या समस्येपासून मुक्तता कशी मिळवायची अशा प्रकारची विचारसरणी प्रत्येकात रुजलेली आहे. मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न आई–वडील करत असतात, परंतु एखादी गोष्ट आपल्या मनासारखी झाली नाही की मुले राग करू लागतात, अशावेळी पालकांनी सामंजस्यानेमुलांचा राग शांत करून तात्पुरता हट्ट पुरवावा परंतु अति हट्ट करत असेल तर अशावेळी त्याला न रागवता प्रेमाने बोलून राग शांत करावा, सर्वच गोष्टी पूर्ण करणे शक्य होत नसते, हेही मुलांना ठणकावून सांगावे, असा सल्ला मानसोपचार तज्ञ देतात, सुरुवातीपासूनच मुलांना हट्ट करत जाऊ नये असे सांगितले पाहिजे, मुले मोठी होऊ लागली की इतरांचे पाहून हट्ट करू लागतात अशावेळी पालकांनी मुलांना अभ्यास करण्यास सांगावे असे तज्ञांचे म्हणणे आहे, अलीकडे टीव्ही मोबाईलच्या अतिवापराने लहान मुले–मुली चिडखोर व भांडखोर होताना दिसून येत आहेत, विभक्त कुटुंब पद्धती याला काही बाबतीत कारणीभूत आहे, त्यामुळे संबंधित मुला–मुलींना आई–वडील आजी आजोबा नातेवाईकांचे परिपूर्ण वेळ व प्रेम मिळणे आवश्यक आहे, अन्यथा मुलांमध्ये वेगळी भावना निर्माण होऊन मानसिकता बदलते, मुले टीव्ही मोबाईलवर कार्टून पाहतात या कार्टून वर हाणामारीचे दृश्य असते, हे कार्टून पाहून मुले हाणामारीचे अनुकरण करतात, तेव्हा कार्टून पाहण्यास पालकांनी मज्ञाव केला तर मुले रागवतात, मुले ही फुलासारखी नाजूक असतात मुलांना रागात बोलले की ते अधिक राग पकडतात मुलांचा राग शांत करायचे असेल तर त्यास जवळ घेऊन प्रेमाने बोलावे शांततेने बोलून हट्ट चांगला नसतो हे सांगावे मुलाला रागावले की तेही तशीच प्रतिक्रिया देतील,या गॅजेट आजारापासून आपल्याला कधी आराम मिळेल? अशी चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे.

# भीषण धडकेत एकाचे धडापासून शीर वेगळे तर दुसऱ्याचा खांद्यापासून हातच तोडला, एकाचा जगात जागेवरच मृत्यू तर दुसऱ्याने ग्रामीण रुग्णालयात दम तोडला

तालुक्यातील मौजे पानोळा येथील एकाच कुटुंबातील वीस ते पंचवीस भाविक ऑटोद्वारे महादेवाचे नवस फेडण्यासाठी आर्णी तालुक्यातील मौजे पांगरी या गावी महादेव मंदिरावर जाऊन पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून नवस फेडून परत येत असताना यापैकी दोघेजण मोटरसायकल वरून माहूरवरून वाई बाजार मार्ग पानोळा जात असताना मौजे उमरा येथील राष्ट्रीय महामार्गावर त्यांना अज्ञात वाहनाने जबर धडक दिल्याने प्रकाश परसराम राठोड वय ५२ वर्ष याचे धडापासून शिर वेगळे झाले तर भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्षे यांच्या खांद्या जवळून हात मोडला या गंभीर धडकेत धडापासून शीर वेगळे झाल्याने प्रकाश जागीच गतप्राण झाला तर भारतने माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात दम तोडल्याची घटना दि ३ ३ २०२५ रोजी रात्री १० वाजता चे सुमारास घडल्याने प्रचंड हळूहळू व्यक्त होत आहे.



किनवट: शेख शौकत :–माहूर तालुक्यातील मौजे पानोळा येथील भारत धनसिंग राठोड वय ५५ वर्ष आणि प्रकाश परसराम राठोड आपल्या परिवारासोबत आर्णी तालुक्यातील पांगरी येथील महादेव मंदिरावर दरवर्षीप्रमाणे नवस फेडण्यासाठी पुरणपोळीच्या नैवेद्य घेऊन गेले होते परत येत असताना परिवारातील सर्व सदस्यांना त्यांनीऑटो द्वारे पाठवून दिले आणि दोघेजण मोटरसायकलने माहूर मार्ग पानोळा जात असताना मौजे उमरा फाट्याजवळ आले असता त्यांना अज्ञात वाहनाने जबर धडक दिली यामध्ये मोटरसायकल क्रमांक च् क २९ ऋ १२४२ चा चेंदामेंदा झाला तर प्रकाश परसराम जाधव यांचे शीर झाडापासून वेगळे झाले तर भारत धनसिंग राठोड यांच्या डाव्या खांद्याला भयंकर दुखापत झाल्याने फासोळ्यापासून ते खांद्यापर्यंत हात तुटून शरीरातील हृदयापर्यंत भयंकर जखम झाल्याने ते खाली पडले रस्त्याने जाणाऱ्यांनी १०८ ला दूरध्वनीवरून कल्पना दिल्याने १०८ म्बुलन्स तात्काळ घटनास्थळावर पोहोचून गंभीर जखमी अवस्थेत जिवंत असलेले भारत राठोड यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात आणले असता येथे उपचार दरम्यान त्यांचा मृत्यू झाला प्रकाश जाधव यांचे शीर जवळपास एक तास रस्त्यावरच होते त्यावरून अनेक वाहने गेल्याचे प्रत्यक्ष दर्शनी सांगितले घटनेची कल्पना मिळाल्याने सपोनि शिवप्रकाश मुळे यांनी लगेच घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करत प्रकाश जाधव यांचे शीर आणि धड स्थानिकांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालयात आणले येथे घटनेची नोंद झाल्यानंतर ग्रामीण रुग्णालयाचे डॉ अक्षय सांगळे आणि आष्टाचे डॉ संदेश राठोड यांनी शवविच्छेदन केले घटना इतकी गंभीर होती की रस्त्यावर रक्ताचा सडा पडलेला होता ट्रामा केअर सेंटर असते तर जखमींचा जीव वाचवला गेला असता अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत होती एकाच घरातील जावई मेहुण्याचा अपघाती मृत्यू झाल्याने पानोळा गावासह तालुक्यात हळहळ व्यक्त होत घटनेचा तपास सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका गजानन चौधरी यांचे सह सिंदखेड पोलीस करीत आहेत.

# बुद्धगयेतील महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात द्या..! केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले



मुंबई / के. एच. हनवते :– –महाकारुणी तथागत भगवान गौतम बुद्धांना जेथे ज्ञानप्राप्ती झाली ते बुद्धगया येथील प्राचीन महाबोधी महाविहार हे जगभरातील बौद्धांचे सर्वोच्च पवित्र श्रद्धास्थान आहे. बौद्धांचे श्रद्धास्थान बौद्धांच्याच ताब्यात असले पाहिजे. महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देणे हा नैसर्गिक न्याय ठरेल. त्यामुळे १९४९ चा महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा दुरुस्त करून महाबोधी महाविहार व्यवस्थापन समितीत सर्व सदस्य बौद्ध असावेत असा कायदा करुन महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे अशी रिपब्लिकन पक्षाची मागणी आहे असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला जाहीर पाठिंबा व्यक्त केला. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला देशभरात रिपब्लिकन पक्षाचा पाठिंबा असून राज्यात रिपब्लिकन पक्ष लवकरच महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मोठे आंदोलन पुकारणार आहे. अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली. महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायद्यात बदल करण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.बिहार सरकार आणि केंद्र सरकार शी बोलणार आहोत. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात मिळवून देण्याचा आपला निर्धार असल्याचे ना. रामदास आठवले यांनी जाहीर केले.

# तक्षशिला बौध्द विहार डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती अध्यक्ष पदी विक्रम धावारे यांची तर सचिव पदी संविधान धावारे यांची निवड



लातूर / प्रतिनिधी :– तक्षशिला बौध्द विहार राहुल नगर लातूर या ठिकाणी महेश ढगे अक्षय धावारे यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंतीची बैठक संपन्न झाली या बैठकीत तक्षशिला बौध्द विहार राहुल नगर डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती पदी विक्रम धावारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी दत्ता जाधव सचिव पदी संविधान धावारे सहसचिव पदी रोहन धावारे कोषाध्यक्ष पदी प्रविण डुमणे सहकोषाध्यक्ष पदी राजकुमार आवटे महादेव अवचारे रोहन आवटे स्वागताध्यक्षपदी हनमंत मांदळे प्रदिप लांडगे सतिष मस्के नरसिंग कांबळे रामकिशन शिंदे शिवाजी आवटे मनोज दहिरे सचिन बल्लाळ नारायण सोनावणे तानाजी सोनकांबळे बालाजी गायकवाड गणेश गवळी योगेश अंकुशराव नितीन मुंडे गोविंद ढगे नितीन वाघमारे यांची निवड करण्यात आली तर मिरवणूक सल्लागार पदी आकाश गायकवाड अर्जुन डुमने किशोर मोरे विशाल पैठणे लखन धावारे यांची तर मिरवणूक प्रमुख पदी अजहर शेख गणेश मोरे तोसिफ शेख विजय कांबळे संजय बनसोडे लतेश आवटे महादेव अवचारे प्रल्हाद पाडुळे मारुती कांबळे नागेश सेवनकर धीरज ढगे बाबा ढगे सिध्दार्थ गवळी राज सातपुते यांची निवड करण्यात आली या वेळी या बैठकीत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात आगळ्या वेगळ्या सामाजिक उपक्रमाने साजरी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला या वेळी भागातील समाजबांधव तक्षशिला बौध्द विहार मित्र मंडळ व महिला मंडळ मोठ्या प्रमाणात उपस्थित.

# चैत्यभूमी इंदू मिल स्मारक परिपुर्ण करण्यास विलंब का ? होतो..!



नवी मुंबई / के. एच. हनवते :– मुंबईतील चैत्यभूमी इंदू मिल या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या उभारणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. मात्र या स्मारकाच्या कामात होत असलेल्या विलंबासह बाबासाहेबांच्या पुतळ्यातील दोषांबाबत चिंता व्यक्त करत, यावर त्वरित तोडगा काढण्याच्या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक दक्षता समितीची बैठक नवी मुंबईतील उलवे येथे यशस्वीरीत्या पार पडली. या बैठकीला श्री. राजाराम पाटील (ओबीसी नेते), श्री. राहुल गायकवाड ( प्रदेश महासचिव, समाजवादी पार्टी ) यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते, कार्यकर्ते आणि जागरूक नागरिक उपस्थित होते, विशेत : महिलेनी प्रखरपणे आपली मते मांडली. मिथुन भानुदास कांबळे यांच्या प्रयत्नाने ही बैठक आयोजित आली होती.

बैठकीतील प्रमुख मुद्दे :

१) इंदू मिल स्मारकाच्या कामातील विलंब चैत्यभूमीवरील इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे देशभरातील आंबेडकरी जनतेसाठी एक अस्मितेचे प्रतीक आहे. मात्र, त्याच्या उभारणीच्या प्रक्रियेत अनावश्यक दिरंगाई होत आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेवर उपस्थितांनी नाराजी व्यक्त केली आणि लवकरात लवकर यावर तोडगा काढण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. यासंदर्भात शासनदरबारी पाठपुरावा करण्यासाठी समितीने पुढील आंदोलन आणि जनजागृती वर चर्चा केली. २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यातील दोष : बाबासाहेबांच्या पुतळ्यात आढळलेल्या त्रुटींचा मुद्दा या बैठकीत सविस्तरपणे मांडण्यात आला. तज्ज्ञ आणि मूर्तिकार यांच्याशी चर्चा करून या त्रुटी दूर करण्याचे समितीने ठरवले आहे. ३) जनजागृती मोहीम : स्मारकाच्या उभारणीबाबत जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये सोशल मीडिया, प्रत्यक्ष संपर्क आणि विविध माध्यमांद्वारे प्रचार केला जाईल. समिती प्रमुखांचे मनोगत : श्री. राजाराम पाटील (ओबीसी नेते) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला आत्मसन्मान आणि हक्क मिळवून दिले. आज आपण त्यांच्या स्मारकाच्या उभारणीसाठी संघर्ष करावा लागत आहे, हे दुर्दैवी आहे. समाजाने संघटित होऊन हा लढा पुढे न्यावा, श्री. राहुल गायकवाड ( प्रदेश महासचिव, समाजवादी पार्टी ) डॉ बाबासाहेबांचे स्मारक म्हणजे फक्त एक इमारत नव्हे, तर तो एक ऐतिहासिक वारसा आहे. स्मारकाच्या कामात होत असलेला विलंब हा अपमानास्पद आहे. आम्ही हे सहन करणार नाही आणि सरकारला लवकरात लवकर उत्तर द्यावे लागेल, मिथुन भानुदास कांबळे आणि नितीन सोमनाथ आढाव यांनीही या बैठकीत महत्त्वपूर्ण मते मांडली आणि सर्वांना एकत्रित येऊन अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले. बैठकीला उपस्थित मान्यवर : सुरेश हिरे, मधुकर रगडे, विजय हबळे, मिलिंद कांबळे, नरेश राऊत, सुनील लोंढे, उमेश हातेकर, अजय अवघडे, मुकेश मोरे, पूनम येवले, सरिता साळवे, विजया हिरे इत्यादी मान्यवरांनी संघटितपणे पुढील कार्यवाही करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# महाबोधी महाविहार तीन दिवसीय धरणे आंदोलनास लोकप्रतिनिधीची भेट.






लातूर :– १९४९ महाबोधी बोधगया कायदा रद्द करून, नवीन सुधारित कायदा पारित करावा व महाबोधी बोधगया मंदिराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या हाती द्यावे या प्रमुख मागणीसाठी लातूर शहरात गांधी चौक येथे पु. भिक्खु संघाच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसीय धरणे आंदोलनाचा दुसऱ्या दिवशी लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी भेट व पाठिंबा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने लातूर जिल्ह्याचे विद्यमान खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, प्रा. सुधीर अनवले, प्रा. कल्याण कांबळे, प्रा.अनंत लांडगे, अशोक कांबळे, केशव कांबळे, चंद्रकांत चिकटे, डी.एस. नरसिंगे, संजय ओव्हाळ, सुनील कांबळे, प्रा. रामराव गवळी, सुशील चिकटे, निलूमाई कांबळे, शोभा सोनकांबळे, सचिन गायकवाड, सुजाता आजनिकर, उदय सोनवणे, डॉ. लहू वाघमारे, आकाश इंगळे, मिलिंद धावारे, उदय सोनवणे यांनी आपल्या भावना आणि मनोगत व्यक्त करीत आपला जाहीर पाठिंबा दिला. डॉ. शिवाजी काळगे यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा प्रश्न संसदेत मांडू तथा या विषयी प्रधानमंत्री, कायदेमंत्री व संभदित विभागाशी चर्चा करण्याचे आश्वासन यावेळी दिले. या वेळी पु. भिक्खु पय्यानंद थेरो, पु. भिक्खु धम्मसार व भंते बुद्धशील, भिक्खुनी मेत्ता व उपासक उपासिकांची लक्षनीय उपस्थिती होती.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE